# प्रकरण - तिसरे

---

# पंढरपूर नगरपालिकेने केलेली विविध विकास कामे

# प्रकरण - तिसरे
# पंढरपूर नगरपालिकेने केलेली विविध विकास कामे

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून पंढरपूर शहरास धार्मिक महत्व प्राप्त झालेले आहे. पंढरपूरच्या धार्मिक फडकरी, दिंडीकरी, मठ, पर्यटक यांच्यात झालेली वाढ तसेच उदयोगधंदे, व्यापार, शिक्षणाचा विकास, आरोग्यसेवा दळवळणाच्या साधनामध्ये झालेली वाढ इत्यादी कारणामुळे पंढरपूर शहराच्या लोकसंख्येत ताण नगरपालिका प्रशासनावर पडत आहे. 'झाडू संतांचे मार्ग, करू पंढरीचा स्वर्ग' हे नगरपालिकेचे असलेले ब्रिदवाक्य खरे करण्यासाठी नगरपालिकेकडून जनतेला मुलभूत सोईसुविधा पुरविल्या आहेत. नगरपालिकेने सर्व दृष्टीकोनातून कामे केलेली आहेत त्यामध्ये स्वच्छता, सामाजिक प्रश्न, शैक्षणिक विकास, रस्ते–निर्मिती अशी विविध कामे करण्यात आलेली आहेत. 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' च्या कायदयामधील कलम ४९ ते ७३ मध्ये नगरपालिकेची कर्तव्ये आणि कार्याची तरतुद आहे.[१] प्रस्तूत प्रकरणामध्ये पंढरपूर नगरपालिकेने केलेल्या सामाजिक कार्ये, सार्वजनिक आरोग्य विषयक कार्ये, शैक्षणिक कार्ये आणि आर्थिक कार्ये इत्यादी क्षेत्रामध्ये केलेल्या कार्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अ) नगरपालिकेची सामाजिक कार्ये :**

पंढरपूर हे शहर धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. या ठिकाणी वर्षातून चार मोठया यात्रा भरत असतात. तसेच मासिक वाऱ्याही असतात या यात्रांसाठी लाखो भाविक भक्त पंढरी नगरीत येत असतात. पंढरपूर शहरामधील लघू व कुटीर उदयोगामुळे शहराचा

विकास व नागरिकरणात मोठया प्रमाणात वाढ झालेली आपणास दिसून येते. अशा या वाढत्या नागररिकरणामुळे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, विषयक समस्या निर्माण होतात अशा अनेक समस्या सोडविण्याचे काम नगरपालिकेच्या माध्यमातून केले जाते.

## पंढरपूर शहराचा पाणीपुरवठा :

ब्रिटीश काळात प्रांरभी पंढपूर शहराला यमाई तलाव व म्हसवड कॅनॉलमधून पाणीपुरवठा केला जात होता.[२] नंतर भीमा नदीच्या पात्रात विहीरी खोदून पाण्याची साठा करून हे पाणी पंपाद्वारे टाकीमध्ये टांगा स्टॅंडपर्यंत आणले. गावातील पाणी वाटप नळाद्वारे केले जात असे. त्यासाठी नगरपालिकेने पाण्याची टाकी बांधली. पंढरपूर शहरामध्ये सध्या १९० पब्लिक स्टॅंड आहेत. पंढरपूर शहरामध्ये जलनिस्सारण केंद्र मनिषानगर येथे आहे. नगरपालिकेद्वारे २२ चौ.कि.मी. अंतरापर्यंत शहरात पाणीपुरवठा केला जातो. पंढरपूर शहरामध्ये स. न. २००३ –०४ मध्ये ५२०० कुटुंबाकडे नळ कनेक्शन आहे. तसेच झोपडपट्टीमध्ये ८७५ कुटुंबाकडे नळ कनेक्शन आहेत.[३] पंढरपूर शहरामध्ये ६ टाकीमध्ये १० लाख लिटर, अनिलनगर टाकीमध्ये १० लाख लिटर, इसबावी टाकीमध्ये ५ लाख लिटर, गणेशनगर टाकीमध्ये ४ लाख लिटर, मनिषानगर टाकीमध्ये २० लाख लिटर तसेच बडवे गल्ली हौदात ४ लाख लिटर व जी. एस. आर मध्ये ६७ लाख लिटर पाणी साठविण्याची क्षमता आहे. पंढरपूर नगरपालिकेने अशा अनेक उंच टाक्या व संलग्न पाईपलाईन करून जनतेला पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पंढरपूर नगरपालिकेने संपूर्ण शहरात पाईपलाईनचे जाळे पसरविण्यात आले आहे. ज्यामधून सुमारे १ लाख लोकसंख्येला दरडोई १४० लाख लिटर पाणीपुरवठा केला जातो. पंढरपूर शहरातील विविध ठिकाणचे व जलशुध्दीकरण येथील पाणी नमूने आठवडयातून २ वेळा जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, सोलापूर येथे तपासणीकरिता पाठविले जाते.

पंढरपूर शहरामध्ये दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत आंबेडकरनगर व अंबिकानगर येथे टाकी बांधण्याचे काम दोन वर्षापासून चालू आहे. आंबेडकरनगर टाकीमध्ये ७ लाखलिटर अंबिकानगर टॉकीमध्ये ७ लाख लिटर पाणी साठविण्याची क्षमता आहे. पंढरपूर शहरामध्ये मनिषानगर येथे जलशुध्दीकरण केंद्र आहे. या जलशुध्दीकरणाची क्षमता २२ लाख दशलक्ष लिटर एवढी आहे. पंढरपूर नगरपालिकेने 'लघू व मध्यम शहरासाठी नागरी पायाभूत विकास योजना (UIDSSMT)' ही केंद्रसरकार पुरस्कृत योजना ३१७५.९५ कोटी रूपयांचा असलेला प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

### पंढरपूर शहराची भुयारी गटार योजना :

पंढरपूर शहरामध्ये पूर्वी खुली गटारे होती व त्यांचे पाणी भीमा नदीत सोडण्यात येत होते. हे सांडपाणी नदीत सोडल्यामुळे ८—१० गावाचे आरोग्य धोक्यात येत होते. नगरपालिकेत स.न १९४८ साली लेंडकी नाल्याची योजना आखली.[४] गावातील सांडपाणी भीमा नदीत न सोडता त्याचा शेतीसाठी उपयोग करण्यात येऊ लागला. या योजनेमध्ये गोपाळपूर नजीक सांडपाण्यांच्या साठवणीसाठी एक टॅंक बांधण्यात येऊन त्यातून पंपिंग करून लगतच्या जमिलीला पाणीपुरवठा करण्यात येऊ लागला आहे. ही योजना जूने गावठाण या भागात राबविण्यात आली आहे. पंढरपूर शहर विशेष विकास आराखडा अंतर्गत डिस्ट्रीक्ट १ व २ मध्ये १५० ते ७०० मी.मी व्यासाचे एकूण २३ कि.मी लांबीचे आर. सी. सी पाईपलाईन शहरात टाकण्यात आली आहे आणि ६.५ दशलक्ष लिटर क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र बांधण्यात आले आहे. तसेच पंढरपूर नगरपालिकेने घरगुती ड्रेनेज जोडणीचे काम प्राध्यान्याने हाती घेऊन पूर्ण

करण्यात आले आहे. मलशुध्दीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया केलेले सांडपाणी शेतीसाठी वापरण्यात येत आहे व मिळणारे स्लेज केक्स ही खत म्हणून वापरण्यात आले आहे. या योजने अंतर्गत गोपाळपूर येथे ६.५० दशलक्ष लिटर क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र बांधण्यात आले आहे.[५] गोपाळपूर येथे नगरपालिकेची एकुण ५१ एकर जमीन मलशुध्दीकरण केंद्रासाठी देण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये प्रथम विष्णूपद पंपीग स्टेशन येथे शहरातील मलयुक्त पाणी पंपिंगद्वारे मलशूध्दीकरण प्रक्रिया केली जाते.

**पंढरपूर शहरातील उद्याने :**

पर्यावरण विषयक बाबीचा समावेश पाणीपुरवठा अंतर्गत होतो. शहरातील लहान मुले व पालक यांच्या आरोग्याची जबाबदारी घेणे हे नगरपालिकेचे एक कर्तव्य आहे. मुलांच्या वाढीसाठी संतूलीत आहार, शुध्द हवा, योग्य व्यायामाचे साहित्य इत्यादी सेवा–सुविधा उपलब्ध करून देणे हे गरीब पालकांना शक्य नसल्याने नगरपालिकेने याबाबत महत्वाची भूमिका बजावली आहे. लहान मुलांसाठी मैदाने, झोपाळे, घसरगुंडी अशा अनेक सेवा जूनी पेठ, बुवावेस, संतपेठ, गोविंदपूर इत्यादी भागामध्ये निर्माण केल्या आहेत. शहराच्या मध्यभागी नगरपालिकेचे जिजामाता उदयान आहे. या उदयानात मुलासाठी ४ झोके व २ उतरत्या घसरगुंडयाची सोय करण्यात आली आहे. जिजामाता उदयान नागरिकांना सांयकाळी ५ ते ८ पर्यत खुली असते. जिजामाता उदयान हे ४ एकर क्षेत्रामध्ये विस्तारलेले आहे. या उदयानामध्ये विविध प्रकारची रोपे, विविध प्रकारची फुलझाडे, आकर्षक लॉन व लहान मुलांसाठी विविध प्रकारची आकर्षक खेळणी तसेच विजेवर चालणारी छोटी रेल्वे गाडी आहे. या उदयानामध्ये आकर्षक छोटा धबधबा आहे.

स्टेशन रोडवर पद्मावती नावाचे एक उदयान आहे. प्रामुख्याने शहराच्या उपनगरीभागामध्ये राहणाऱ्या नागरीकांसाठी हे उदयान विकसीत करण्यात आलेले आहे. या उदयानाचा विस्तार १० एकर क्षेत्रामध्ये झालेला आहे.[६] या उदयानात पद्मावती देवीचे प्राचीन मंदिर आहे. त्यामुळे या उदयानास पद्मावती उदयान असे म्हणतात. या मंदीराभोवतीची तटबंधी प्राचीन काळी बांधलेली आहे. पूर्वीच्या काळी त्या ठिकाणी पद्मावती तलाव होता. त्याचा वापर पंढरपूर शहराच्या पाणीपुरवठयासाठी केला जात होता. या उदयानात वेगवेगळया प्राण्याची प्रतिकृती, लहान मुलांसाठी ट्रेन, झोपाळे, घसरगाडया, सुंदर कारंजे, आकर्षक लॉन, वजनकाटे तसेच वेगवेगळया फुलांच्या आकर्षक बागा इत्यादीची सोय करण्यात आली आहे. हे उदयान सायंकाळी ६ ते ८ पर्यत नागरिकांना खुली ठेवण्यात येतात.

शासनाने पंढरपूर शहरात दोन हजार झाडे लावण्यासाठी उदिद्ष्ट ठरवून दिले आहे. पंढरपूरचे महाबळेश्वर करण्याची योजना नगरपालिकेने ठरविले आहे. शहरामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. शहरातील उपनगरात नगरपालिकेच्या खुल्या जागेत वृक्ष लागवड केली आहे. सरकारने पर्यावरणाच्या संरक्षणासाठी १९७२ पासून सामाजिक वनीकरण कार्यक्रम सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत पंढरपूर नगरपालिकेने झाडे लावणे व त्याचे संरक्षण करणे हा उपक्रम हाती घेतलेला आहे. गजानन नगर येथे नव्या पाणी टाकीजवळ वृक्षारोपणाचा कार्यक्रम नगरपालिकेने हाती घेतला आहे.[७] झाडे लावणे व जतन करणे हे काम नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत केले जाते.

**पंढरपूर शहर पोलिस स्टेशन व एस.टी. बसस्थानक :**

पंढरपूर शहरात नागररिकांच्या संरक्षणासाठी तसेच कायदा व अंतर्गत सुरक्षिततेसाठी शहर पोलिस स्टेशन आहे. तसेच पोलिस स्टेशनची मुख्य इमारत शहराच्या

मध्यभागी आहे. शहर पोलिस स्टेशनच्या लगतच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बसस्थानक आहे. याच पंढरपूरचे आमदार मा. सुधाकरपंत परिचारक हे महाराष्ट्र राज्य एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष आहेत. यात्राकालावधीमध्ये मोठया प्रमाणात यात्रेकरूंची ये–जा चालू असते त्यासाठी  महाराष्ट्र एस. टी. महामंडळ मोठयाप्रमाणात बसेसची सोय उपलब्ध करून देते तसेच पंढरपूर शहराला हातभार म्हणून अर्बन बॅंक कर्ज पुरवठा करते पंढरपूर शहरामध्ये जिल्हा सत्र न्यायालय, दिवाणी व फौजदारी न्यायालय आहे.

### पंढरपूर शहरातील करमणुकीची साधने :

पंढरपूर शहरामध्ये सरगम, न्यू अकबर, अरूण इ. चित्रपटगृहे आहेत.

### पंढरपूर शहरातील विठ्ठल मंदिर व विविध धार्मिक मठ :

विठ्ठल मंदिरामुळे पंढरपूर शहराला महाराष्ट्राची 'दक्षिणकाशी' म्हणून ओळखले जाते. तसेच संतांचे माहेरघर, वारकरी संप्रदायाचे आदयपीठ, दक्षिणद्वारका म्हणून ही ओळखले जाते. विठ्ठल रूक्मिणि या दोघांचे एकच नसून विठ्ठलाच्या पाठीमागीलबाजूस रूक्मिणी मंदिर आहे. प्रत्येक दिवसी सरासरी 25 हजार भाविक विठ्ठल– रूक्मिणीचे दर्शन घेतात. विठ्ठल मंदिरा लगतच भाविकांच्या सोयीसाठी सात मजली दर्शनमंडपाची इमारत उभारली आहे. या दर्शन मंडपामध्ये तीन लाख भाविक एका वैळेस बसू शकतात.

पंढरपूर शहरामध्ये विविध धार्मिक मठ आहेत. त्यामध्ये संत कैकाडी महाराज, संत तनपुरे महाराज मठ, जयतुंबे महाराज मठ, केंद्रे महाराज मठ, गजानन महाराज मठ इ. मठ प्रामुख्याने आहेत. या मठामध्ये देवदेवतांच्या प्रतिकृती तयार करून महाराष्ट्राची संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न केला आहे.

**पंढरपूर नगरपालिकेचे फायर ब्रिगेड :**

फायर ब्रिगेड हे पाणीपुरवठा विभागाच्या कार्यरत आहे. नगरपालिकेच्या वतीने अग्नीशमन सप्ताह साजरा केला जातो. अग्निशमन यंत्रणेतील कर्मचारी जीव धोक्यात घालून मालमत्तेचे व जीवांचे रक्षण करीत असतात. आग प्रतिबंधक उपायाबाबत जनजागृती करण्यासाठी मुख्याधिकारीच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात फेरी काढण्यात येते. या फेरीत आगीपासून बचावाची प्रात्याक्षिके जनतेसमोर दाखविण्यात येतात. अग्निशामन गाडी शहराच्या बाहेर कार्य करीत असेल तर नगरपालिका अधिक कर लावीत असे. पंढरपूर नगरपालिकेमध्ये अग्निशमन अधिकारी नाही.[८]

**पंढरपूर नगरपालिकेने अनुसूचीत जाती-जमातीसाठी केलेल्या सुधारणा :**

अनुसूचित जाती – जमातीच्या लोकांना आवश्यक त्या सर्व सोई उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दवाखाने, प्रसुतीगृहे, शाळा, धर्मशाळा, सार्वजनिक नळ इत्यादी ठिकाणी या जाती– जमातींना कोणताही भेदभाव न करता प्रवेश दिला जातो. नगरपालिकेने हरिजन वस्तीमध्ये शौचालय, दिवे व पाणीपुरवठा यांची सोय कली आहे. नगरपालिकेत हरिजन लोकांसाठी सहा चाळी बांधल्या आहेत.[९] तसेच लोकांसाठी सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या बांधून देण्यात आलेल्या आहेत. हरिजन चाळीसाठी दिवाबत्तीची सोय करण्यात आलेली आहे. मागासलेल्या जमातीमध्ये भंगी लोकांचा समावेश होतो. या लोकांकडून शहरातील मैला उचलली जाते. या लोकांना घाणीची कामे करावी लागत असल्यामुळे नगरपालिकेमार्फत या लोकांना अनेक सेवा–सुविधा पुरविल्या जातात. सर्व भंगी व झाडूवाले लोकांना रजेबाबत सर्व सवलती इतर नोकरवर्गाप्रमाणे देण्यात येतात.

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या :**

पंढरपूरमध्ये वर्षातून चार यात्रा व, मासिक व वाऱ्या भरत असतात. त्यामध्ये लाखो भाविक पंढरपूरमध्ये येतात. जास्त लोकसंख्येमुळे शौचालयाची मोठया प्रमाणात गैरसोय होते. त्यामुळे ही गैरसोय होऊ नये म्हणून संतपेठ, स्टेशनरोड व सोलापूर रोड अशा अनेक ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली आहेत. पंढरपूर शहराची लोकसंख्या व नागरीकरण यांच्यात झालेली वाढ आणि पंढरपूरास येणाऱ्या भाविकांची गरज लक्षात घेऊन नगरपालिकेने विविध ठिकाणी सार्वजनिक संडास व मुताऱ्या बांधण्यात आल्या आहे.

पंढरपूर प्राचीन धार्मिक तीर्थक्षेत्र असल्याने शहराच्या साफसफाईकडे नगरपालिकेने सुरूवातीपासूनच लक्ष दिले आहे. यात्रा काळात व यात्रेनंतरही शहर स्वच्छ करण्याचे काम नगरपालिका करीत असते. सुरूवातीला रात्रीची मैला वाहून नेली जात असे. पूर्वी ही मैला बांबुच्या पाटयातून भंगी लोक डोक्यावरून वाहून नेत असत. सन १९६६—६७ साली नगरपालिकेने मैला वाहून नेण्यासाठी माणसाऐवजी ट्रक, ट्रॅक्टर आणि बैलगाडया इत्यादीचा वापर केला जाऊ लागला.[१०] नवीन घरे बांधताना शौचालय बांधणे हे नगरपालिकेने सक्तीचे केले आहे. शहरातील सर्व सांडपाणी गोपाळपूर येथील लेंडकी नाल्यात सोडून त्यापासून कंपोस्ट खत बनविण्यासाठी मैलाचा वापर होऊ लागला. अशा पध्दतीने नगरपालिकेने शहरातील सांडपाण्याची व्यवस्था केली आहे. सध्या नगरपालिकेने सर्व शौचालये गटारांना जोडल्या आहेत.

**पंढरपूर शहरातील दिवाबत्तीची सोय :**

पंढरपूरमध्ये ब्रिटिश काळात रॉकेलवर चालणाऱ्या कंदीलामार्फत दिवाबत्तीची सोय केली होती. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे पुणे व सोलापूर शहरापाठोपाठ पंढरपूरमध्ये दिवाबत्तीची सोय करण्यात आली. कोयना वीज प्रकल्पाच्या निर्मितीमुळे

पंढरपूर शहरामध्ये विदयुत दिव्याची सोय झाली. सध्या पंढरपूरला कोयना वीज प्रकल्पातून विदयुतसेवा पुरविली जाते.

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक रस्ते बांधणी व दुरूस्ती :**

स्वातंत्र्यापूर्वी पंढरपूर शहरातील रस्ते कच्या स्वरूपात होते. सन १९४७ नंतर रस्त्यांचे रूंदीकरण व दुरूस्तीचे काम नगरपालिकेने हाती घेतले. धुळीच्या रस्त्याचे कच्या रस्त्यात, कच्या रस्त्याचे खडीच्या रस्त्यात, खडीच्या रस्त्याचे डांबरी रस्त्यात अशा पध्दतीने रस्त्यांची निर्मिती होत गेली. आज पंढरपूर शहरामध्ये सर्वत्र रस्त्यांचे डांबरीकरण झाले आहे. प्रत्येक गल्ली– गल्लीतून रस्ता डांबरीकरण केले आहे.

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालये :**

पंढरपूर शहरामध्ये दोन वाचनालये आहेत चंद्रभागा नदीच्या काठी 'नगरवाचन मंदिर' नावाचे एक वाचनालय आहे. या वाचनालयाची स्थापना १ एप्रिल १८७४ मध्ये झाली आहे[११] शिवाजी चौकामधील जिजामाता उदयानालगत एक वाचनालय आहे. या वाचनालयामध्ये लोकमत, पुढारी, सकाळ, लोकसत्ता, तरूण भारत, नवाकाळ, इंडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स हे वर्तमानपत्रे तसेच मासिके, ग्रंथ, कांदबरी इत्यादी साहित्य वाचनासाठी उपलब्ध आहे. ही दोन्ही वाचनालये सकाळी ८ ते १२ आणि दुपारी ४ ते ८ पर्यंत वाचकासाठी खुली असतात. तसेच पंढरपूर शहरामध्ये सावरकर वाचनालय आहे.

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक क्रिडांगणे :**

सार्वजनिक आरोग्याकडे नगरपालिकेने काळजीपूर्वक लक्ष दिले आहे. लहान मुलांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी नगरापालिकेने लहान मुलांना शुध्द हवा मिळावी, त्यांचे शारिरीक आरोग्य चांगले रहावे यासाठी खेळाची मैदाने व व्यायामाचे साहित्ये उपलब्ध करून दिली आहेत. शहरामध्ये विविध ठिकाणे नगरपालिकेच्या मालकीची मैदाने आहेत.

**पंढरपूर शहरातील भंगी मुक्ती योजना :**

पंढरपूर शहरामध्ये आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री यात्रेस व प्रत्येक मासिक वारीला लाखो भाविक येत असतात. पंढरपूर शहराची दिवसेंदिवस लोकसंख्येत वाढ होत चालली आहे तसेच नागरिकरणही मोठया प्रमाणात झाले आहे. या वाढत्या नागरिकांच्या आरोग्य व स्वच्छता या बाबतीत नगरपालिकेने महत्वाची भूमिका बजावत आहेत. शहरातील कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रक, बैलगाडी इत्यादी साधनांचा वापर केला जातो. रस्त्यावरील मैला काढून टाकण्यासाठी नगरपालिकेमार्फत अनेक कर्मचारी नेमले आहेत. या कर्मचाऱ्यामार्फत संपूर्ण शहर स्वच्छ केले जाते. भंगी मुक्ती योजनेचा एक भाग म्हणून टोपली संडासाचे रूपांतर ॲक्रप्रिव्हीत करण्याची योजना सरकारी सहायाने नगरपलिकेने सुरू केली आहे.[१२]

भंगी कामगार, झाडु कामगार व गटार सफाई कामगार यांना नगरपालिकेकडुन अनेक बाबतीत सुविधा पुरविण्यात येतात. या लोकांना राहाण्याची तसेच त्यांच्या पाल्यांना नगरपालिकेच्या संबंधित दवाखान्यात मोफत औषधोपचार व नगरपालकेच्या शाळेतून मोफत शिक्षण दिले जाते. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा प्रयत्न नगरपालिका करीत असते. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपालिकेकडून कामगारांना अनेक साधने पुरविली जातात. त्यामध्ये घमेले, खराटे, टोकरे, फावडे, हातगाडे इत्यादी साधनांचा समावेश होतो.

**पंढरपूर शहरातील शॉपिंग सेंटर :**

पंढरपूर शहरामध्ये अनेक छोटे– मोठे लघु व कुटिरउदयोग प्रगत आहेत. त्यामध्ये बत्तासे, दाळे, चिरमुरे भट्ट्या, अगरबत्ती कारखाना, कुंकु कारखाना, कोळसा वखारी, साबण कारखाना, उपहारगृहे, भोजनगृहे, मेवा मिठाई दुकाने, ऊसांचे चरके, लाकूड

व्यापारी, चुना व विट भट्ट्या, गिरण्या व ऑईल मिल्स इत्यादी विविध उदयोग विकसित झालेले आहेत. अशा उदयोगांना विठठ्ल देवस्थानामुळे चालना मिळाली आहे. धार्मिक तीर्थक्षेत्रामुळे पंढरपूरच्या लघु व कुटीर उदयोगात वाढ झालेली आहे. लघु व कुटीर उदयोगामध्ये निर्माण होणाऱ्या मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतुने नगरपालिकेने शॉपिंग सेंटर स्थापन केलेली आहेत. नगरपालिकेने शहराच्या विविध भागात शॉपिंग सेंटर उघडलेली आहेत. पंढरपूर नगरपालिकेच्या मालकीची एकूण 14 शॉपिंग सेंटर आहेत, ती पुढीलप्रमाणे :– कर्मवीर औदुंबर पाटील, महात्मा फुले, शिवाजी चौक, दर्शनमंडप, यशोदा, इंद्रप्रस्थ– १, इंद्रप्रस्थ– २, इंदिरा गांधी, ज्ञानेश्वर नगर रूक्मिणी, पद्मावती, महाद्वार, नवीपेठ, जिजामाता. या शॉपिंग सेंटरमध्ये सर्व मिळून ६१७ गाळे आहेत.[१३] या शॉपिंग सेंटर मुळे शहराच्या सौदर्यामध्ये अधिकच भर पडलेली दिसून येते. शॉपिंग सेंटरमध्ये व्यवसायाच्या सोईसाठी नगरपालिकेने वीजपुरवठा यासारख्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शॉपिंग सेंटरला कै. औदुंबररावजी पाटील व्यापारी संकुल, पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर, सुधाकरपंत परिचारक शॉपिंग सेंटर अशी विविध नावे दिलेली आहेत.

शॉपिंग सेंटरमध्ये किराणा मालाची दुकाने, गिफ्ट हाऊस, ट्रॅव्हल्स ऑफिस, इलेक्ट्रीक वस्तूची दुकाने, शालेय दुकाने, सायबर कॅफे, कपडयांची दुकाने, लहाने मुलांच्या खेळण्याची दुकाने, फोटो स्टुडिओ, मेडिकल, टेलिफोन बूथ, इत्यादी अनेक प्रकारचे व्यवसाय असल्याचे दिसून येते. लघु व कुटीर उदयोगामुळे अनेकांना रोजगारांची संधी प्राप्त झालेली दिसून येते. या शॉपिंग सेंटरमधून मोठी अर्थिक उलाढाल होत आहे. यामुळे पंढरपूरला येणारे वारकरी, भाविक– भक्त, पर्यटक यांची संख्या वाढली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन नगरपालिका अनेक लोकोउपयोगी सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्नाशील असते.

**पंढरपूर शहरातील भाजी मंडई :**

नगरपालिकेने शहरामध्ये दोन भाजी मार्केट स्थापन केली आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी भाजी मंडई नगरपालिकेने निर्माण केली आहे. लोकसंख्येची वाढती गरज लक्षात घेऊन नगरपालिकेने कृष्णाच्या हौदाजवळ भाजी विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे. या मंडईमधून जीवनावश्यक सर्व वस्तु उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या जागेमधून नगरपालिकेला मोठया प्रमाणात कर मिळतो. शहरातील लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून नगरपालिकेने कराड धर्मशाळेजवळ गाळे बांधले आहेत.[१४]

**पंढरपूर शहरातील कत्तलखाना :**

पंढरपूर शहरात एकच कत्तलखाना आहे तसेच दोन मटण मार्केट आहेत. हे मटण मार्केट उत्तर व दक्षिण भागात आहे. आरोग्य अधिकारी वेळोवेळी कत्तलखान्याची पाहणी करीत असतात. तसेच शहराच्या उत्तर भागामध्ये मटणमार्केट शेजारी एक मच्छी मार्केट आहे.

**पंढरपूर शहरातील स्वस्त धान्य दुकान योजना :**

नागरिकांनास जीवनावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिकेने शहरातील विविध भागात स्वस्त धान्य रेशन दुकाने निर्माण केली आहेत यामध्ये गहू, तांदूळ, डाळी व रॉकेल या वस्तू नागरिकांना पुरविल्या जातात. शहरामध्ये रॉकेलचे गाडे विविध भागातून फिरवून नागरिकांना रॉकेल पुरविले जाते. नगरपालिकेचे अधिकारी वर्ग स्वस्त धान्य दुकानाची तपासणी करून वस्तू, वजनमापे, वस्तू वाटप पावत्या, सध्याच्या मालाची स्थिती इत्यादी माहिती वेळोवेळी घेतली जाते.

**पंढरपूर शहरातील स्मशानभूमी :**

नगरपाालिकेने पंढरपूरमधील वेगवेगळया जाती– धर्मातील लोकांच्या प्रेतांची विल्हेवाट लावण्यासठी स्मशानभूमी व दफनभूमी यांची सुविधा उपलब्ध करून दिलेली

आहे. शहरात पाच ठिकाणी स्मशानभूमीची ठिकाणे आहेत. गोपाळपूर रस्त्याच्या पूर्वेला एक स्मशानभूमी, चंद्रभागा नदीकाठी 'मढी घाट' स्मशानभूमी, मुस्लिम समाजासाठी एक दफनविधी गोंधळवाडी जवळ व दूसरी पंढरपूर– सांगोला रस्त्याच्या डाव्या बाजूला आहे. ख्रिश्चन लोकांसाठी मिशन बंगल्याजवळ दफनभूमी आहे. संन्यासी लोकांकरिता एक दफनभूमी आहे. या सर्व स्मशानभूमी व दफनभूमीवर नगरपालिकेचा मालकीहक्क आहे.

अशा प्रकारे विविध सामाजिक कार्ये करण्यामध्ये नगरपालिकेने महत्वाची भूमिका घेतलेली दिसून येते.

### ब) पंढरपूर नगरपालिकेचे आरोग्यविषयक कार्ये :

पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. पंढरपूर शहरात मोठया प्रमाणात नागरीकरणात वाढ झालेली आहे. त्यामुळे नगरपालिकेला आरोग्याच्या दृष्टीने जनतेला योग्य त्या सुविधा पुरवाव्या लागतात. नगरपालिकेमधील आरोग्य विभागाचा प्रमुख हा आरोग्याधिकारी असतो. या विभागामार्फत शहरातील सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य सुस्थितीत राखण्याचे महत्वपूर्ण काम केले जाते. शहर उपनगरांतील रस्ते, गटारी, नाले, ड्रेनेज लाईन, सेप्टीक टॅंक इत्यादीची स्वच्छता व साफसफाईचे काम सफाई कामगार व सुपरव्हिजन स्टाफ यांच्या मार्फत करून घेतले जाते. कामकाजाच्या सोयीसाठी शहराचे विविध विभाग पाडून त्यावर मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व सहाय्यक आरोग्य निरीक्षक हे सफाई कामगाराकडून कामे करून घेतात. तसेच आरोग्याधिकारी हे जन्म– मृत्यू निबंधक म्हणून काम पाहत असतात. शहरातील खादयपदार्थ आस्थापना व भयकारक अपायकारक आस्थापना यांच्यांवर नियंत्रण अन्न निरीक्षक यांच्या मार्फत आरोग्याधिकारी ठेवीत असतात.

पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने पंढरपूर शहरातील ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी घंटा गाडीची सोय केली घंटा गाडीद्वारे शहरातील ओला व सुका कचरा गोळा करून त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प नगरपालिकेने कासेगाव येथे सुरू केला आहे. त्यामधील ओल्या कचऱ्या पासून विजनिर्मिती करण्यात येणार आहे. तर सुका कचरा खत म्हणून वापर करण्यात येणार आहे. नगरपालिकेची घंटा गाडी सकाळी ७ ते १० या वेळेत कचरा गोळा करण्याचे काम करते.

पंढरपूर शहरामध्ये वर्षातून चार मोठया यात्रा भरत असतात. या यात्रा झाल्यानंतर पंढरपूर शहरात प्रत्येक घरातील २ किंवा ३ माणसे आजारी पडतात. संपूर्ण पंढरपूर शहरात दुर्गंधी व रोगराई पसरते. याचा प्रत्यक्ष परिणाम शहरातील नागरिकांच्या जनजीवनावर पडत असतो. कॉलरा, हिवताप, मलेरिया, डेंग्यू, गोवर, कांजण्या, विषमज्वर, श्वसनर रोग, डोळे येणे, न्यूमोनिया, क्षयरोग इत्यादी अनेक रोगांची लागण होते. या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी नगरपालिकेने विविध योजना राबविलेल्या आहेत.

**पंढरपूर नगरपालिकेची हिवताप निर्मूलन योजना :**

'हिवताप निर्मूलन योजना' महाराष्ट्र शासनाच्या वतीने नगरपालिका अंतर्गत योजना राबविण्यात येते.[१५] नागरी हिवताप योजनेअंतर्गत हिवताप प्रतिबंधकासाठी घाण पाण्याची डबकी व पाणथळ जागावरती डास उत्पत्ती प्रतिबंधक फवारणी केली जाते. नगरपालिकेचे सेवकवर्ग प्रत्येक घरा– घरात जाऊन डास उत्पत्ती प्रतिबंधक फवारणी करीत असतात. तसेच नगरपालिका वेळोवेळी 'नागरी हिवताप योजना' या नावाने पंढरपूर शहरामधील प्रत्येक घरा–घरात जाऊन नगरपालिकेचे सेवकवर्ग पत्रके देत असतात. या पत्रकांवर हिवताप निर्मूलन करण्यासाठी आवश्यक त्या सूचना नागरिकांना दिल्या जातात. या पत्रकांवर हिवताप नियंत्रणासाठी नागरिकांनी डास

होऊ नयेत म्हणून कोणती दक्षता घेतली पाहिजे अशा आशयाचे पत्रक जनतेला दिली जातात. पंढरपूर नगरपालिकेने हिवताप निर्मूलनासाठी पुढील उपाययोजना पत्रकाद्वारे जनतेपर्यंत पोहचविलेल्या आहेत –

१) पाणी साठविण्याची भांडी उदा – हौद, डेरे, रांजन, बॅरल, ड्रम्स, पिंप, सिन्टेक्सच्या टाक्या इत्यादी प्रत्येक आठवडयाला धुवून पुसून नंतर पाणी भरावे व त्यावर घटट् झाकण ठेवावे.

२) फ्रिज, कुलर, मनीप्लॉंट, घरातील फुलदाणी यामधील पाणी आठवडयातून दोन वेळा बदलावे.

३) घराच्या गच्चीवर, बाल्कनीमध्ये पाणी साठू देऊ नये.

४) गाडीचे टायर्स, प्लास्टिकचे डबे इत्यादी भंगार यामध्ये पाणी साठू देऊ नये.

५) घराच्या भोवताली पाणी साठू देऊ नये.

६) रात्रीच्या वेळी अगरबत्ती व मच्छरदाणीचा वापर करावा.

७) डासांची वाढ होण्यास जागा न दिल्यास डासांची वाढ होणार नाही. डासांची उत्पत्ती झाली नाही तर हिवताप डेंग्यू होणार नाही यासाठी डासाची उत्पत्ती थांबविली पाहिजे.[१६]

वरील उपाययोजना नागरिकांना समजावून जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न नगरपालिकेकडून केला जातो. पंढरपूर शहरातील घरे डी.डी.टी ने स्प्रे करण्यात येतात. डी.डी.टी अगर ग्रॅमेग्झान पावडर याचा वापर करून घरामध्ये फवारा मारण्याचे काम मोफत केले जाते. 'नागरी हिवताप विभाग' हा एक स्वतंत्र विभाग पंढरपूर नगरपालिकेमध्ये कार्यरत आहे. या विभागामार्फत डासांचे व त्यापासून उद्‌भवणारे सोयीचे रोगाच्या निर्मूलनाचे कार्य केले जाते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## पंढरपूर शहरातील कुटुंब कल्याण कार्यक्रम :

लसीकरणाचा कार्यक्रम हा शासनातर्फे सुरू करण्यात आला आहे. बी.सी.जी, पोलीओ, तिहेरी लस, दुहेरी लस, धनुर्वात, प्रतिबंधक लस इत्यादी लसीकरण कार्यक्रम कुटुंब कल्याणमार्फत देण्यात येतात. पोलिओ रोगापासून लहान मुलांचा बचाव होण्यासाठी ७ वर्षाच्या आतील सर्व मुलां– मुलींची नावे दर तीन महिन्याला नोंदी नगरपालिकेच्या दवाखान्यात करून घेतल्या जातात. पोलिओ लसीकरण नगरपालिकेच्या सर्व दवाखान्यातून दिले जाते.

## कॉलरा रोग निर्मुलन बाबत केलेले उपाय :

कॉलरा हा रोग दूषित पाण्यामुळे होतो. कॉलरारोगासाठी कॉलरा प्रतिबंधक लस टोचण्यात येते. जनतेने घ्यावयाच्या दक्षतेबाबत ही सूचना दिल्या जातात.

## पंढरपूर नगरपालिकेचे प्रसूतीगृह व बालसंगोपन केंद्र :

शहरातील नगरपालिकेने चालविलेले एक व खाजगी चार प्रसुतीगृहे सिल्हर ज्यूबिली होम या नावाने ओळखले जाते. या प्रसुतीगृहात एक डॉक्टर, एक मिडवाईफ, एक कंपाऊंडर व तीन वॉर्ड आया कामास आहेत. नगरपालिकेच्या दवाखान्यात स्त्रियांची आरोग्य तपासणी केली जाते व त्यांना गरोदरपणी घ्यावयाच्या दक्षतेबाबतही माहिती व सल्ला देण्यात येतो. गरोदर स्त्रियांची महिन्यातून एकदा रक्तदाब, पचन, लघवीबाबत तपासणी करण्याची व्यवस्था केली आहे. पंढरपूर नगरपालिकेने " सिल्हर ज्युबिली मॅटनीटी होम" या संस्थेची स्थापना १९४० मध्ये केली आहे.

## पंढरपूर शहरातील कुटुंब नियोजन केंद्र :

पंढरपूर नगरपलिकेच्या दवाखान्यात कुटुंब नियोजन केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रामार्फत स्त्रियांना मोफत सल्ला दिला जातोतसेच या केंद्रामार्फत स्त्रियांना संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया, औषधोपचार व मोफत सल्ला दिला जातो.

**घटसर्प, विषमज्वर व धनुर्वात रोगांचे निर्मुलन करण्याबाबत केलेले उपाय :**

घटसर्प, विषमज्वर व डांग्या खोकला या रोगावरील प्रतिबंधक लस नगरपालिकेच्या दवाखान्यात मोफत टोचणेची व्यवस्था करण्यात येते.

**पंढरपूर शहरातील आयुर्वेदिक दवाखाना :**

पंढरपूर शहराच्या उत्तर भागामध्ये नगरपालिकेचा एक दवाखााना आहे. या दवााखान्यामध्ये एक आयुर्वेदिक केंद्र सन १९२३ साली स्थापन करण्यात आले आहे.[१७]

पंढरपूर नगरपालिकेच्या दवाखानाचा प्रमुख मुख्य वैदयकीय अधिकारी असतो. या विभागांतर्गत मुख्य वैदयकीय अधिकारी असतो. या विभागांतर्गत मुख्य रूग्णालय, कोरोनेशन दवाखाना कुटंबकल्याण केंद्र व आयुर्वेदिक केंद्र हे विभाग कार्यरत आहेत. नगरपालिकेच्या मुख्य रूग्णालयामध्ये ४५ खाटांचे आंतर रूग्णालय, प्रसूतीगृह, क्ष–किरण विभाग इत्यादी सुविधा आहेत. प्रत्येक विभागात तज्ञ वैदयकीय अधिकारी, परिचारिका व इतर कर्मचारी वर्ग पुरेशा प्रमाणात आहेत. अत्यल्प मोबदल्यात नागरिकांना सर्व प्रकारचे औषधोपचार पुरविले जातात. या दवाखान्यात चार वैदयकीय अधिकारी आहेत. तसेच दवाखान्यामधील सेवेचा लाभ घेणाऱ्या रूग्णांची सरासरी २००—२५० इतकी असते.[१८]

वरील सर्व बाबीचा आढावा घेतल्यानंतर आपणास दिसून येते की, नगरपालिकेने आरोग्याच्या बाबतीत महत्वाची भूमिका बजावलेली दिसते.

**क) पंढरपूर नगरपालिकेचे शैक्षणिक कार्य :**

व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे एक महत्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या सुप्तगुणांचा विकास होतो. शिक्षणाद्वारे ज्ञानाची प्राप्ती होते. शिक्षणामुळे मानवी जीवन सुसंस्कृत होते, मानवास सुशिक्षित म्हणून समाजात मानाचे स्थान प्राप्त होते. शिक्षणाविषयीचा दृष्टीकोन स्पष्ट करताना सॉक्रेटिसने असे मत व्यक्त केले आहे की,

'सद्गुणाचा विकास व्हावा आणि नागरिक ह्या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्याची प्रवृत्ती आणि पात्रता ह्यांत वाढ व्हावी अशा दृष्टीने शिक्षण देण्यात यावे.[१९] शिक्षणामुळे सद्गुणी आणि शीलसंपन्न नागरिक तयार होत असतात. शिक्षणामुळे सद्गुण व चारित्र्य इत्यादीकांची वाढ होते. शिक्षण हा मानवी प्रगतीचा राजमार्ग आहे जे या राजमार्गाने जातात ते जीवनात यशस्वी होतात. शिक्षणाला व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनात अनन्यसाधारण असे महत्व आहे. शिक्षणाचे महत्त्व जाणूनच पंढरपूर नगरपालिकेने प्राथमिक, माध्यमिक तसेच औद्योगिक प्रशिक्षणाची सुविधा नागरिकांना प्राप्त करून दिलेली आहे.

**प्राथमिक शिक्षण :**

पंढरपूर शहरामध्ये मुलांची, मुलींची शाळा, मागासवर्गीय शाळा, संस्कृती, उर्दू, इंग्रजी शाळा तसेच व्हिक्टोरिया ज्यूबिली हायस्कूल अशा अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन नगरपालिकेद्वारे केले जात होते. सन १९१३–१९१४ साली चार मुलांच्या व एक मुलींची शाळा होती. मुलींची शाळा 'लिमयेवाडा' या इमारतीमध्ये सुरू होती.[२०]

मुंबई प्राथमिक शिक्षण आधिनियम 1925 च्या अन्वये शिक्षण मंडळाची स्थापना ५ मार्च १९२५ मध्ये करण्यात आली. हे मंडळ नगरपालिकेच्या अधिकाराखाली होते. नगरपालिकेशी संबधित असणाऱ्या आणि नगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या सर्व प्राथमिक शाळांवरती शिक्षण मंडळाचे नियंत्रण होते.[२१] प्रत्येक शाळेत विदयार्थ्यांना शारिरीक शिक्षण देण्यात येते तसेच एक शारिरीक शिक्षकाची प्रत्येक शाळेत नियुक्ती केली जाते. सन १९७४ मध्ये शासनाने पुस्तक पेढी योजना स्थापन केली आहे. या योजनेद्वारे शाळेतील सर्व मागासवर्गीय विदयार्थ्यांना मोफत पुस्तके दिली जातात. शासनाने सन १९९५–९६ पासून मुलांची शारिरीक वाढ चांगली व्हावी, आरोग्य चांगले रहावे यासाठी

''शालेय पोषण आहार योजना'' सुरू केली आहे. पंढरपूर नगरपालिकेने शिक्षक दिनानिमित्ताने प्राथमिक शिक्षण मंडळातर्फे आदर्श शिक्षकाचा सत्कार करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. नगरपालिका व खाजगी प्राथमिक शाळांमधील आदर्श शिक्षक, गुणवंत व सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात येतो.[२२] तसेच गरीब व होतकरू विदयार्थ्यांना गणवेश व वहयांचे वाटप केले जाते.

**माध्यमिक शिक्षण :**

लोकमान्य विदयालय ही पंढरपूर शहरातील सर्वात जुनी व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली व शैक्षणिक गुणवत्ता कायम जोपासणारी अशी शिक्षणसंस्था म्हणून ओळखली जाते. पंढरपूर नगरपालिका संचलित लोकमान्य विदयालयाची स्थापना १६ फेब्रुवारी १८८७ (दासनवमी) रोजी झाली.[२३] ब्रिटिश काळात या विदयालयाचे नाव 'व्हिक्टोरिया ज्युबिली स्कूल' असे होते. सन १९४८ मध्ये व्हिक्टोरिया ज्युबिली स्कूलचे नाव बदलून लोकमान्य विदयालय असे नामकरण केले.[२४] लोकमान्य विदयालय हे चंद्रभागेच्या तीरावरील एक 'विदयातीर्थ' बनले आहे. जनमाणसात लोकमान्य विदयालयाला 'आजोबाशाळा' म्हणुन स्थान लाभले आहे.[२५]

लोकमान्य विदयालयाच्या एकूण दोन इमारती आहेत. त्यापैकी मुख्य इमारत चंद्रभाग नदीच्या काठी व दुसरी शाखा शहराच्या मध्यभागी दिवाणी कोर्टासमोर आहे. लोकमान्य विदयालयामध्ये इयत्ता ५ ते १० पर्यंत शिक्षणाची सोय आहे. परिक्षेत प्राविण्य मिळविलेल्या विदयार्थ्यांचा गौरव करण्यात येतो. लोकमान्य विदयालयात गणेश उत्सव, टिळक पुण्यतिर्थी, गांधी जयंती, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, शाळेचा वर्धापन दिन, बालदिन असे अनेक दिन साजरे केले जातात. या विदयालयात प्रत्येक वर्षी सहलीचे आयोजन केले जाते.

**औदयोगिक प्रशिक्षणा संस्था :**

पंढरपूर शहरामध्ये विदयार्थ्यांना माध्यमिक शिक्षणानंतर छोटे व व्यवसायाभिमुख कोर्स करण्याची कोणतीही सोय नव्हती, विदयार्थ्यांची ही गरज लक्षात घेऊन पंढरपूर शहरात 'औदयोगिक प्रशिक्षण संस्था' चा कोर्स करण्याबाबतचे प्रपोजल नगरपालिकेने शासनाकडे पाठविले पंढरपूर शहरामध्ये ६ ऑगस्ट १९८४ मध्ये महाराष्ट्र सरकारच्या वतीने औदयागिक प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली.[२६] सुरूवातीस औदयोगिक प्रशिक्षण संस्था ही नगरपालिकेच्या लिमयेवाडयात सुरू होती. या संस्थेत एकूण नऊ विभाग आहेत. यामध्ये फिटर, मोटार मॅकेनिक, प्लबंर, ट्रॅक्टर मॅकॅनिक, कारपेंटर, वेल्डर, इलेक्ट्रीयन्स, ब्रास्मन, सिविल, कॅम्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोगॅमिंग इ. विभाग आहेत. महाराष्ट्र सरकारने कासेगाव मार्गे जाणाऱ्या रस्त्याच्या शेजारी औदयोगिक प्रशिक्षण संस्थेची नवीन इमारत बांधण्यात आली आहे. या संस्थेचे एकूण क्षेत्र ७.८ हेक्टर एवढे आहे. औदयोगिक प्रशिक्षण संस्थेच्या क्षेत्रामध्ये मुख्य इमारत, कार्यशाळा, वसतिगृहे आणि प्राचार्य निवास व कर्मचारी निवासस्थाने आहेत.

विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी संस्थेने विशेष प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये त्यामध्ये विदयार्थ्यांची मासिक/त्रैमासिक परिक्षा घेतली जाते, प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा पालकांना कळविला जात असे, प्रशिक्षणार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते, तज्ञ लोकाचे व्याख्यान आयोजित केले जाते इ. गोष्टी संस्थेमार्फत केल्या जातात. संस्थेने विकासाबाबतही काही योजना राबविलेल्या आहेत त्या पुढीप्रमाणे –

१) संस्थेमध्ये मुलींसाठी नवीन व्यवसायांची मागणी केली आहे.
२) 'एक प्रशिक्षणार्थी एक झाड' या योजनेअंतर्गत ५०० झाडांची लागवड केली आहे.
३) प्रशिक्षणार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते.
४) संस्थेमध्ये विविध विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते.
५) संस्थेमध्ये मुकबधीर विदयार्थ्यांना मोफत व्यवसाय प्रशिक्षणा दिले जाते.

६) 'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना एमएसईबी चे मीटर रिडींगचे काम मिळवून दिले जाते.

७) 'व्यवसाय शिक्षण आपल्या दारी' ही योजना फेब्रवारी २००६ मध्ये राबविलेली आहे.

८) संस्थेमध्ये निराधार महिलांना मोफत व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते.

९) कुष्ठपिडितांना मोफत प्रशिक्षण दिले जाते.[२७]

**शिकाऊ उमेदवारी योजनाः**

इ. स. १९६१ च्या कायद्यानुसार शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत संस्थेतील एक किंवा दोन वर्षाच्या कालावधीतील विदयार्थ्यांना व्यवसाय अभ्यासाच्या जागा उपलब्ध करून दिल्या जातात. या योजनेअंतर्गत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते.

**मागेल त्याला प्रशिक्षण योजनाः**

'मागेल त्याला प्रशिक्षण' योजनेअंतर्गत एस.सी, व्ही. जे/एन. टी, एस. टी, ओ. बी. सी व ओपन बी. पी. एल या सर्वांसाठी ही योजना राबविली जाते.[२८] या योजनेमुळे प्रशिक्षणार्थ्यांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये आर्क वेल्डींग / गॅस वेल्डिंग/ फॅब्रीकेशन वर्क, घरगुती वायरिंग, घरगुती विदयुत उपकरणांची दुरूस्ती, मोटार रिवायडिंग, कारपेंटरी लेथ वर्क, प्लंबिंग वर्क, स्कूटर/मोटार/सायकल रिपेंअरिंग, जीप ड्रायव्हिंग, ट्रॅक्टर ड्रायव्हिंग, ट्रॅक्टर रिपेअरिंग इत्यादी व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले जाते. ही योजना शासनामार्फत राबविली जाते. तसेच ही योजना प्रशिक्षणार्थ्यांना मोफत दिली जाते. प्रशिक्षणार्थ्यांना या योजने बाबत शासनाचे प्रमाणपत्र व टुलकीट मोफत दिले जाते.

औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांकडून वस्तू निर्माण करून त्याची विक्री करणे ही योजना संस्थेत राबविलेली आहे. पंढरपूर नगरपालिका शाळेत या योजनोअंतर्गत शेंडचे काम केले आहे तसेच सन २००५ मध्ये नगरपालिकेच्या बंद कचरा कुंडया २७ नग तयार करून देण्यात आल्या आहेत. या योजनेमुळे नागरिकांना कमी दरात विविध वस्तू विकल्या जातात.

## ड) पंढरपूर नगरपालिकेची आर्थिक कार्ये :

पंढरपूर नगरपालिकेने विविध विकास कामे केली आहेत. पंढरपूर शहराच्या विकासामध्ये नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. पंढरपूर नगरपालिकेने २००२ ते २००७ या कालावधीमधील सामान्य प्रशासन आणि वसुलीचा खर्च, सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य व सोयी, शिक्षण, संकीर्ण कामे इत्यादींवर करण्यात आलेला खर्च पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ३.१**

**पंढरपूर नगरपालिकेने केलेल्या विविध विकासकामांच्या खर्चाचा तपशील**

| क्र. | लेखाशिर्ष | २००२ ते २००७ या कालावधीमधील खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| अ) I) | सामान्य प्रशासन आणि वसुलीचा खर्च | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | ३६९३८७७ | ३६३९०६९ | ४२८४०७४ | ४४५०००० | ४९००००० |
| २. | प्रवास भत्ता | १२८७९८ | १०८७९८ | १३५०१६ | १५०००० | १८१४९६ |
| ३. | आकस्मित खर्च | ५७८०५५ | ६१५६६७ | ५७५१५२ | ५१०८९७ | ६३०००० |
| ४. | नमुने छपाईचा खर्च | १३०२८७ | २६१२१० | ३०४४३८ | २८२००० | २६५००० |
| ५. | वेतन राखीव निधीला अंशदान | २१५५७३६ | १७२८८७१ | ९८४८०६ | १५०७८२ | ० |
| ६. | स्थायी अस्थापन शॉप ॲक्ट | ८५५४३ | ९४१० | ९४१० | ९४१० | ९४१० |
| | **एकूण** | **६७७२२९६** | **६३६३०२५** | **६२९२८९६** | **५५५३०८९** | **५९८५९०६** |
| II) | कर वसूली | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना- जकात | ३८९१६७२ | ४१०१३१५ | ४५११७३९ | ४७००००० | ५१११००० |
| २. | आकस्मित खर्च | १५२९ | १२१६४ | ९०५७ | १५००० | १५०० |
| | **एकूण** | **३८९३२०१** | **४११३४७९** | **४५२०७९६** | **४७१५०००** | **५१२६०००** |
| III) | घरपट्टी खाते | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | १५८१५१९ | १७०६४३६ | १८९३१५६ | २०००००० | २२३१००० |
| २. | आकस्मित खर्च | १२६१८१ | ११९८७१ | ९०३३० | २००००० | २००००० |
| ३. | रिव्हीजन छपाई व अलौन्स | ० | ० | ० | २०६८० | ० |
| | **एकूण** | **१७०७७००** | **१८९८३०७** | **१९८३४८६** | **२२२०६८०** | **२४३१०००** |
| IV) | परतावे | | | | | |
| १. | घरपट्टी रिफंड | १६८९८४ | ३३५९० | ६११३८ | ३००००० | १००००० |
| २. | घरपट्टी रिबेट | १४८४३५ | ८३८४७ | ९६५२५ | ८५००० | १२५००० |
| | **एकूण** | **३१७४१९** | **११७४३७** | **१५७६६३** | **३८५०००** | **२२५०००** |
| **V)** | **निवृत्ती वेतन व उपदाने** | **१२६७६८४०** | **१३०२६७०४** | **१५३१०३४२** | **१६००००००** | **१७१०००००** |
| ब) | सार्वजनिक सुरक्षितता | | | | | |
| I) | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना अग्निशामक | ६३६१८४ | ६३८११८ | ७०६७९९ | ८११४०० | १०००००० |
| २. | इंधन खर्च | १८९६५३ | १८५५२३ | २८२३०० | ३७५००० | ४३२००० |
| ३. | आकस्मित खर्च | ९५३७ | १३०९५ | १०८७० | ११०००० | ११०००० |

| क्र. | लेखाशिर्ष | २००२ ते २००७ या कालावधीमधील खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| ४. | साधनसामग्री व भांडारे खरेदी | ० | १७८७५ | ९००० | १४५००० | १४५००० |
| ५. | अग्निशामक वर्गणी | ० | ० | ० | २०००० | ३००००० |
| ६. | अग्निशामक वाहन खरेदी व दुरूस्ती | ८७३८२ | ६६८२७ | २५०९३३ | १२३००० | २००००० |
| | **एकूण** | **९२२७५६** | **९२१४३८** | **१२५९९०२** | **१५८४४००** | **२१८७०००** |
| **II)** | **<u>रस्त्यावरील दिवाबत्ती</u>** | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | ३३३२३७ | ३९९९४९ | ५०४७३० | ५९०००० | ६५०००० |
| २. | आकस्मित खर्च | १४०४५ | ३९९२५ | ३२०१४ | ६०००० | ७०००० |
| ३. | दिवे व इतर वस्तु खरेदी | २७८०८४ | ५८६३०० | ८८३४४५ | १७९०००० | १७००००० |
| ४. | उपयोगात आणलेला विजेचा खर्च | ३२२८१३२ | ३३९८९११ | ३२१९४२७ | ४५००००० | ५०००००० |
| | **एकूण** | **३८५३४९८** | **४४२५०८५** | **४६३९६१६** | **६९४००००** | **७४२००००** |
| **III)** | | | | | | |
| १. | मोकाट आणि पिसाळलेल्या कुत्र्याचां नाश करणेस खर्च | ५३९६ | ३७७० | ८४८५ | १५००० | १५००० |
| २. | काटेरी निवडुंग आणि निरूपयोगी झाडे काढून टाकणे | १९२५१ | १०५५१२ | ० | ० | ० |
| | **एकूण** | **२४६४७** | **१०९२८२** | **८४८५** | **१५०००** | **१५०००** |
| **(क)** | **<u>आरोग्य व सोयी</u>** | | | | | |
| **I)** | **<u>पाणी पुरवठा विभाग</u>** | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | ६२१८०९ | ६९२९९३ | ८०२९०३ | ९६०००० | १२००००० |
| २. | अस्थायी अस्थापना | ४०८०० | २७७५० | ११६५० | ३९८०० | ५११०० |
| ३. | आकस्मित खर्च | १५४३७७ | १३४४६१ | १२२८११ | १२५००० | १२५००० |
| ४. | दुरूस्ती, परिक्षण व इतर साहित्य | २३५६५२ | ६१०९० | ३१९८८४ | ६००००० | ६००००० |
| ५. | पाईप फिटिंग व्हॉल्व्ह दुरूस्ती | ३३६७०८ | २२००३६ | ८२२६१९ | ७००००० | ६००००० |
| | **<u>जलशुद्धीकण केंद्र</u>** | | | | | |
| ६. | स्थायी अस्थापना | २६४५८९२ | २९०३७०७ | ३२७०२२४ | ३८००००० | ४१७८००० |
| ७. | अस्थायी अस्थापना | १३८५० | ० | ० | ० | ० |
| ८. | वीज खर्च | ६२८१९८९ | ७७९५५४३ | ७६७२३६१ | ६६००००० | ७५००००० |
| ९. | पाटबंधारे पाणी बील | १७८७८३० | ८६१७१७ | ४८२२७८५ | ८१००००० | १२४०००० |
| १०. | म.रा.वि. मंडळ थकबाकी | ० | ० | ० | ५९७१७७ | ० |
| ११. | रसायने | ६२२४४४ | ६७२०५६ | ५२०७०४ | ९७०७३५ | ११६७००० |
| १२. | इतर खर्च व दुरूस्ती | २८३८५४ | ४८९४४० | ६४९६८४ | ३१७६००० | ६९००००० |
| १३. | प्रदूषण मंडळ उपकर | ० | ० | ८७६०३२ | २००००० | २००००० |
| १४. | पाणीपुरवठा थकबाकी | ४५१६२३६ | ० | ४७७७४१६ | ६०२१६५६ | ६०२१६५६ |
| १५. | आकस्मित खर्च | २६५४९२ | २९६८७२ | ८२३६५ | १००००० | १२५००० |
| १६. | परिक्षण फी | ५०२५० | २०१० | ४२५५८ | १५००० | १५००० |
| | **एकूण** | **१७८५७१८३** | **१४१५७६७५** | **२४०५३९९६** | **३२००५३६८** | **२९९२२७५६** |
| **II)** | **<u>साफसफाई व सोयी</u>** | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना - जनरल **कॉन्सटक्न्सी** | ९८८९५३२ | ११०३७४२२ | १२६६४३२५ | १३००००००० | १४२००००० |
| २. | साफसफाईच्या गाड्याची, लॉन्यांची निगा, खरेदी, भाड्याने घेणे | १०३१६१ | २६१७७१ | २०४८६६ | ३५०००० | ४००००० |
| ३. | पेट्रोल व वंगण वगैरे | ६६९०९८ | ९०२८६३ | ७०८६४० | ८००००० | ८५०००० |

| क्र. | लेखाशिर्ष | २००२ ते २००७ या कालावधीमधील खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| ४. | साफसफाईचे साहित्य खरेदी | १६९५५६ | २७६६१९ | २४८५४० | ४५०००० | ४५०००० |
| ५. | कचरा कोंडाळी / कंटेनर खरेदी / बांधकाम | ० | ४९९३ | ० | ५००००० | १८४५००० |
| ६. | स्थायी अस्थापना - **विशेष सफाई** | २१७७२९४ | २३८११६७ | २६५१६५६ | २५००००० | ३१००००० |
| ७. | सार्वजिनक संडास बांधणे व दुरूस्ती | ९५६१२ | ३५४१२ | १८४७० | ० | ० |
| | **एकूण** | **१३१०४२५३** | **१४९००२४७** | **१६४९६४९७** | **१७६०००००** | **२०८४५०००** |
| **III)** | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना - **कंपोस्ट** | १६४९४८८ | १९६५६१० | २१७८२२१ | २२००००० | २४००००० |
| २. | आकस्मित खर्च | ० | ० | ० | ० | १०००० |
| ३. | कंपोस्ट डेपो दुरूस्ती व व्यवस्था | ७४५० | १५०० | ० | १०००० | १००००० |
| | **एकूण** | **१६५६९३८** | **१९६७११०** | **२१७८२२१** | **२२१००००** | **२६१००००** |
| **IV)** | **रूग्णालये व दवाखने** | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | २८१२८५३ | ३२०७९४१ | ३६१६८६० | ३७६५०४४ | ४१००००० |
| २. | अस्थायी अस्थापना | ३२१०० | ४५०० | ० | ० | ० |
| ३. | आकस्मित खर्च | ८१४१९ | ६०९४४ | ७२६४३ | ६५००० | १००००० |
| ४. | औषधे व उपकरणे खरेदी | ३३०५०४ | ६६१६६७ | ३८१५४४ | ६५०००० | ६५०००० |
| ५. | रूग्णांना आहार पुरविणे | ११३३२ | ६१४७ | ३७९५ | ५०००० | ५०००० |
| ६. | रूग्णवाहिका इंधन व दुरूस्ती | १३८०७१ | १८४३८५ | १८७७६१ | २४९२४० | ३००००० |
| | **एकूण** | **३४०६२७९** | **४१२५५८४** | **४२६२६०३** | **४७७९२८४** | **५२०००००** |
| **V)** | **जलनिःसारण** | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | २५६६९२६ | २६४७२६७ | ३११९८३४ | ३२००००० | ३६००००० |
| २. | गटारे, कचराकुंडे व मुतारी दुरूस्ती | २८१९४४ | २८९२६० | ३१९२०५ | २९९२७६ | ४००००० |
| ३. | वीज, साहित्य खरेदी, दुरूस्ती व परिरक्षण | १२३४१३७ | ११८५०४६ | १२५८२०८ | २०००००० | ३०००००० |
| ४. | झाकलेली गटारे व लेंडकी नाला सफाई | ६०४९५ | १५२२८५ | ० | १७५००० | १७५००० |
| | **एकूण** | **४१४२७०२** | **४२७३८५८** | **४६८९२४७** | **५६७४२७६** | **७१७५०००** |
| **VI)** | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना- **पर्यवेक्षक** | २१७५१३५ | २२०५०८९ | २६५२४२२ | २६७०००० | २९८५००० |
| २. | आकस्मित खर्च | १०८६८९ | ८४९९८ | १२९५१४ | २००००० | २००००० |
| ३. | स्थायी अस्थापना- **अन्नभेसळ** | २७५८६७ | ३०४९८६ | २९३०९८ | ३३०००० | ३४०००० |
| ४. | आकस्मित खर्च | ३७२६ | २८५६ | ० | १४००० | १५००० |
| | **एकूण** | **२५६३४१७** | **२५९७९२९** | **३०७५०३४** | **३२१४०००** | **३५४००००** |
| **VII)** | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना - **आर्यु-दवाखना** | ३८९३४२ | ३६६००१ | ४३६९९५ | ५२६००० | ५४५००० |
| २. | आकस्मित खर्च | २२७ | ३९० | २९९ | ६०० | २००० |
| ३. | औषध खरेदी | ४४८७७ | ० | २८३२२ | ० | ५०००० |
| ४. | स्थायी अस्थापना - **कुटुंब कल्याण केंद्र** | ५६७६६६ | ६०९३०६ | ७११८०३ | ७६७००० | ९२०००० |
| ५. | अस्थायी अस्थापना | १३८०० | ० | ० | ० | ० |

| क्र. | लेखाशिर्ष | २००२ ते २००७ या कालावधीमधील खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| ६. | औषधे व उपकरणे यांची खरेदी | ० | ० | ० | ० | १००० |
| ७. | आकस्मित खर्च | ३२५० | ५०० | ५०० | १५०० | १५०० |
| | **एकूण** | **१०१९१६२** | **९७६१९७** | **११७७९१९** | **१२९५१००** | **१५१९५००** |
| **VIII)** | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना - **जन्म-मृत्यु** | १६७५८० | १६१७५४ | १६३८४६ | १९०००० | २०५००० |
| | **एकूण** | **१६७५८०** | **१६१७५४** | **१६३८४६** | **१९००००** | **२०५०००** |
| **IX)** | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना - **नागरी हिवताप** | १४९३६३२ | १५७९९७८ | १८३२६५९ | २०००००० | २२००००० |
| २. | वाहन इंधन व दुरूस्ती | ३५०० | ५४३२ | ३१५१५ | ३०००० | १५००० |
| ३. | आकस्मित खर्च | २५०७५ | ५१९१२ | १८५३४ | ४२२६३ | ५०००० |
| | **एकूण** | **१५२२२०७** | **१६३७३२२** | **१८८२७०८** | **२०७२२६३** | **२२६५०००** |
| **X)** | | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना - **रॅट ट्रॅपिंग देणी** | ५२०५५९ | ६०२९४७ | ७३२४३७ | ७९०००० | ८२५००० |
| | **एकूण** | **५२०५५९** | **६०२९४७** | **७३२४३७** | **७९००००** | **८२५०००** |
| **XI)** | <u>सार्वजनिक उद्यान</u> | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | ३३४४८८ | २४२८४० | ३०९५१९ | ३४०००० | ३६५००० |
| २. | आकस्मित खर्च | ० | ३८७५ | २२०१७ | ११०००० | ११०००० |
| ३. | उद्यान विकास व सुधारणा | १०९६१४० | ९०१५५५ | ४०६७७५ | २०००००० | ४००००० |
| | **एकूण** | **१४३०६२८** | **११४८२७०** | **७३८३११** | **२४५००००** | **८७५०००** |
| **XII)** | <u>यात्रा खाते</u> | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | १३१३८०६ | १२६१६३८ | १५६३५४८ | १७२३००० | १८३०००० |
| २. | अस्थायी अस्थापना | ६५२४७० | ० | ० | ० | ० |
| ३. | यात्रा अनुषंगिक खर्च | १८१५६३० | ३४८९८७६ | ५५३२०२५ | ६५२२१७७ | ७१००००० |
| ४. | जंतूनाशके व औषधे यांची खरेदी | १८६६४१४ | १९११९३६ | ३१०२६३९ | २२००००० | २५००००० |
| | **एकूण** | **५६४८३२०** | **६६६३४५०** | **१०१९८२१२** | **१०४४५१७७** | **११४३००००** |
| | <u>बांधकामे</u> | | | | | |
| १. | स्थायी अस्थापना | २१९४०९३ | २६२४०४० | ३०३९९३० | ३०२६००० | ३४००००० |
| २. | तात्पुरती अस्थापना (नगर रचनाकार) | ५०७०२६ | ७२०५६४ | ७८६१५१ | ३०९०८३ | ० |
| ३. | खरटे माती उचलणे, रोड ड्रेसिंग | १४७७७५ | ३३३०५५ | ० | ४००००० | ४००००० |
| ४. | कंपाऊंड, गेट, बॅरेकेटींग, पाईप रोलिंग | ४६९१ | १७१३४ | ९७४६१ | ३००००० | ३००००० |
| ५. | आकस्मित खर्च | २४७१६६ | ४३८३१७ | १९२८२३ | २००००० | २००००० |
| ६. | इमारतीची दुरूस्ती | ४४३४८६ | ४५७०५२ | ६५५२३४ | ५००००० | ५००००० |
| ७. | रस्ता दुरूस्ती | २६२५९४५ | २४१६९७० | ३३१५२८६ | ३५००००० | १५००००० |
| ८. | भूसंपादन रूंदीकरण खर्च | ६००९९२ | ५३४४९१ | ४५५७२२ | १५००००० | १५००००० |
| ९. | अतिक्रमण काढणे | १२१३५५ | ० | ० | १५०००० | १५०००० |
| १०. | माहितीसाठी बोर्ड बनवून रंगवून लावणे | ० | १२५८८ | ४९७१ | १०००० | १०००० |

| क्र. | लेखाशिर्ष | २००२ ते २००७ या कालावधीमधील खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| ११. | नवीन इमारत इंटरकॉम, फॅक्स, फर्निचर, जनरेटर, लिफ्ट, बोर्ड, अंतर्गत सजावट | ८८६१३ | ३३०६१७ | १७२६८ | ५००००० | ५००००० |
| | **एकूण** | **६९८११४२** | **७८८४८२८** | **८५६४८४६** | **१०३९५०८३** | **८४६००००** |
| **(ड)** | **शिक्षण** | | | | | |
| १. | प्राथमिक शिक्षण १०% हिस्सा | १९२२५८० | २६१३७१२ | २५६२४६५ | २६३७२०८ | २०२९००० |
| २. | अपात्र अनुदान | ३३२८० | ३५००० | ४१००० | ५६४४७ | ५०००० |
| ३. | माध्यमिक शिक्षण छपाई स्टेशनरी पुस्तके खरेदी | ४३६२ | १९३८ | १०३८ | १५००० | ३०००० |
| ४. | रिकव्हेबल फी | ५२६१ | ४८८४ | ४००० | १७३९ | १०००० |
| ५. | माध्यमिक शिक्षण निवृत्ती वेतन | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | आकस्मित खर्च | ९०६४६ | ४३७३१ | १५६६८ | २००००० | ४००००० |
| ७. | गरीब होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या-पुस्तके बाबत | ९९४० | ० | ४४९६० | १००००० | १५०००० |
| ८. | संगणक खरेदी, देखभाल व दुरूस्ती | १०३२८ | १०२०६२ | १९६८९ | ६००० | १५०००० |
| ९. | ड्रॉइंग हॉल बांधणे व इमारत दुरूस्ती | ० | ० | ० | ० | ५००००० |
| १०. | भांडारे व साधन सामग्री | २८१० | २५०० | १००० | ३०००० | १००००० |
| ११. | स्कूल डेव्हलपमेंट | ० | ० | १३८७३० | १०००० | ३००००० |
| १२. | नवीन अभ्यासक्रम साहित्य खरेदी व वर्कशॉप दुरूस्ती | ० | ० | ० | ० | १००००० |
| १३. | पुस्तके, नियतकालिके आणि लेख यांची खरेदी | १५४८६ | १४४७८ | १४७५० | ११२४३ | २५००० |
| | **एकूण** | **२०९४६९०** | **२८१८३०५** | **२८४३३३०** | **३०६७६३७** | **३८४४०००** |
| **(इ)** | मूळ आणि भांडवली बांधकामासाठी भांडवली लेखामध्ये हस्तांतरण | १२४०२५१७ | १९६२७३२६ | २०७९७३८४ | ४८५५११५२ | २८७७०००० |
| १. | पाणी पुरवठा निधी | ० | २५००० | ० | १३३९ | २५००० |
| २. | शौचकुप निधी | ० | २५००० | ० | ५६९३ | २५००० |
| ३. | सिंकिंग फंड | ० | २५००० | ० | १३३९ | २५००० |
| ४. | वृक्ष संरक्षण निधी | ० | ४९८६६ | ० | ४३७०० | २५००० |
| ५. | घसारा निधी | ० | २५००० | ० | १३३९ | २५००० |
| ६. | निवृत्ती वेतन निधी | ० | २५००० | ० | ३००१३३९ | ३०००००० |
| | **एकूण** | **१२४०२५१७** | **१९८०२१९२** | **२०७९७३८४** | **५१६०६३०१** | **३१८९५०००** |
| **(फ)** | **संकीर्ण** | | | | | |
| १. | कर्ज परतफेड व व्याज | २८९४८५१ | ३२४४०४५ | ३०१५८२९ | ३१००००० | ३५००००० |
| २. | अध्यक्ष सभासद व मानधन | ६०९५० | ७४६०० | ७३९१६ | १००००० | ३२५००० |
| ३. | मानपत्रे देणे व सत्कार समारंभ | ५८२९ | ११०१४ | १२१५४ | ७००० | ७००० |
| ४. | जयंती, पुण्यतिथी, पुतळे निगा | ७५९९४ | २६७३२ | ३१६९० | ५०००० | ५०००० |
| ५. | टुरिंग कार खर्च व दुरूस्ती खर्च | ४७७२३ | २२३४७० | १३४३०८ | २००००० | २००००० |
| ६. | झाडे लावणे व जोपासणे | २२४० | ११८०१८ | ३८७५९६ | ५००००० | ५००००० |

| क्र. | लेखाशिर्ष | २००२ ते २००७ या कालावधीमधील खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| ७. | निवडणूक खर्च | ५५६८ | १६३०४ | २००००० | १५०००० | १२००००० |
| ८. | दावे खटले यांच्या संबंधातील खर्च | १८०३७५ | १८३८९२ | ४४९६४६ | ४००००० | ४००००० |
| ९. | शेतसारा | ५५७१०३ | १६४३३१५ | २१८३३६४ | ० | ० |
| १०. | प्रशासकीय वर्गणी | ० | ११०३० | ११०३० | ० | ० |
| ११. | टोपली संडास नागरिकांना अनुदान | ३००० | ४००० | ० | ० | ० |
| १२. | रजा वेतन श्रेणी | ६०३ | ९०९ | ९२७०४ | २११६२४ | १६४४० |
| १३. | पेन्शन वर्गणी | ५९१ | ८८२ | १०८५३१ | ७१०१७ | १३८६० |
| १४. | पदाधिकारी व कामगार प्रशिक्षण | ९७५० | ४५५४२ | ० | १००००० | १००००० |
| १५. | खकामगार गणवेश | १४८९६१ | २६९३२८ | २१५१८६ | २३०००० | २५०००० |
| १६. | नगराध्यक्ष चषक | २०९०० | ० | ० | ५०००० | ५०००० |
| १७. | आदर्श कामगार | १२०० | ९००० | ५००० | १०००० | १०००० |
| १८. | पंढरपूर नगरपरिषदेस १५० वर्षे झाल्यानिमित्त खर्च | ० | ० | ० | ५००००० | ० |
| १९. | कॉम्प्युटर खरेदी व निगा | ३५४२२ | ५७४२८ | ११०५२ | २५०००० | २००००० |
| २०. | महापूर २००५ | ० | ० | ० | २२४३९८ | ० |
| २१. | क्रिडा संकुल अनुदान शासनाकडे परत पाठविला | ० | ० | ० | ३००००० | ० |
| २२. | कर्मचारी मेडिकल | ० | ० | ० | ० | ५०००० |
| २३. | साहित्य संमेलन देणगी | ० | ० | ० | २५००० | ० |
| २४. | आर्थिक गणना मानधन | ० | ० | ० | ६७६८० | ० |
| | एकूण | ४०५१०६० | ५९३९५०९ | ६७३२००६ | ६५४६७१९ | ६८७२३०० |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२-२००७ प्रमाणे)[२९].

## इ) यात्राकाळातील पंढरपूर नगरपालिकेचे योगदान :

अवघ्या महाराष्ट्राची अध्यात्मिक राजधानी असलेल्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दरवर्षी चार यात्रा (आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी) भरतात. या यात्रेसाठी येणाऱ्या भाविक भक्तांना वारकरी असे संबोधण्यात येते. या यात्रेकरूंना पाणी, आरोग्य व स्वच्छता इत्यादी सुविधा पुरविणेची प्राथमिक जबाबदारी पंढरपूर नगरपालिकेची आहे. चार यात्रा पैकी आषाढी व कार्तिकी या यात्रा मोठ्या प्रमाणात भरतात. यात्रेपूर्वी जवळ जवळ एक महिना अगोदर यात्रेची तयारी नगरपालिकेमार्फत युद्धपातळीवर सुरू असते. यात्रा कालावधीत नगरपालिकेची यंत्रणा २४ तास कार्यरत असते. पंढरपूर नगरपालिकेचे विविध विभाग आपापली कार्ये व्यवस्थितपणे पार पाडीत असतात.

१) आरोग्य विभाग :

यात्राकाळात नगरपालिकेचा आरोग्य विभाग महत्वाची भूमिका बजावतो. यात्रा कालावधीपूर्वी शहरामध्ये विशेष स्वच्छता मोहिम राबविली जाते. यात्राकाळात या विभागामार्फत शहरातील स्वच्छता, दर्शनबारी स्वच्छता करणे, प्रदक्षिणा रोड स्वच्छ करणे, वाळवंटाची स्वच्छता करणे इत्यादी कामे केली जातात. संपूर्ण शहरातील स्वच्छता करण्यासाठी यात्राकाळात हंगामी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. हे हंगामी कर्मचारी १५ दिवस स्वच्छतेचे काम करीत असतात. पंढरपूर नगरपालिकेचे ३४८ सफाई कामगार, ४५ सुपरवायझर व ७२४ हंगामी कर्मचारी शहरातील स्वच्छतेचे काम करतात.[३०] यात्राकाळात आरोग्य विभागाकडील ५ वाहने, कंटेनर, शासकीय टिपर इत्यादी वाहनाने दररोज ४ ते ५ टन कचरा उचलण्यात येतो. पंढरपूर नगरपालिकेचे अधिकारी वर्ग पाण्याचे नमुने तपासतात. विंधन विहिरी, आड, बोअर यांचे शुद्धीकरण केले जाते. तसेच पाण्याची ओ.टी. घेतली जाते. एप्रिल २००७ ते ऑक्टोबर २००७ मध्ये पाण्याचे ४०० नमुने घेण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. आरोग्य विभागाने ९२१ पाण्याचे नमुने घेतले होते त्यापैकी ९८९ योग्य, व २३ अयोग्य पाण्याचे नमुने निघाले होते.[३१] पंढरपूर शहरात जंतुनाशके फवारण्यात येतात.

यात्राकाळात अनेक ठिकाणी प्रथमोपचार केंद्र उभारण्यात येतात. सारडा भवन, पत्रा शेड दर्शनबारी, तनपुरे महाराज मठ, कैकाडी महाराज मठ आणि मुक्ताबाई मठ इत्यादी ठिकाणी १५ मेडिकल एंजन्सीज असतात. सोलापूर येथून मेडिकल इंटरनीज मागविण्यात येतात. मोकाट जनावरांचा बंदोबस्त केला जातो. मोकाट जनावांना कोंडवाड्यात टाकले जाते. नगरपालिकेचे कायम डॉक्टर व २० हंगामी डॉक्टर, २० नर्सेस इत्यादी २४ तास कार्यरत असतात. यात्राकाळात यात्रेकरूंना २४ तास आरोग्य सेवा पुरविली जाते.

पंढरपूर नगरपालिकेने यात्रेकरूंच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाची सोय केली आहे. पंढरपूर शहरामध्ये १० ठिकाणी ३०५ सीट्स आहेत. त्यापैकी १८० पुरूष व १२५ स्त्रियेंसाठी सुलभ शौचालये आहेत. पंढरपूर नगरपालिकेचे सार्वजनिक संडास ३६ ठिकाणी आहेत, सार्वजनिक मुतारी ५९ ठिकाणी आहेत. याशिवाय यात्रा कालावधीत नगरवाचन मंदिराजवळ, उर्दु शाळेजवळ, गोपाळपूर दर्शन बारी जवळ भुयारी गटारावर ६० संडास तयार करण्यात येतात. चंद्रभागा नदीच्या घाटावर ७ ठिकाणी ९०० सीट्सचे सुलभ शौचालये तयार करण्यात आली आहेत.[३२] यात्राकाळात हॉटेल्स, तात्पुरती हॉटेल्स तपासणे व अन्नाचे नमुने तपासले जातात. पंढरपूर नगरपालिकेचे १ अन्न निरीक्षक व शासनाचे ३ अन्न निरीक्षक कार्यरत असतात. पंढरपूर नगरपालिकेचे कर्मचारी व हंगामी कर्मचारी शहरातील अतिक्रमण दूर करतात. यात्रा कालावधीमध्ये कॉलरा, हॉस्पीटल येथे हंगामी स्वरूपाचे रूग्णालय व नगरपरिषद मुख्य दवाखना, कोरोनेशन दवाखना, आर्युवेदिक दवाखना येथे औषधोपचाराची सोय करण्यात येते. पंढरपूर नगरपालिका आरोग्य विभागामार्फत यात्रा कालावधीत ध्वनीक्षेपकावरून, वृत्तपत्रके, हँड बिल इत्यादी मार्फत जनजागृती केली जाते.

**२) बांधकाम विभाग :**

पंढरपूर नगरपालिका बांधकाम विभागामार्फत अनेक महत्त्वाची कामे केली जातात. पंढरपूर नगरपालिकेचे कर्मचारी व हंगामी कर्मचारी यात्रेपूर्वी शहरातील सर्व महत्त्वाचे रस्ते, प्रदक्षिणा रस्ता, मंदिरा भोवतालचा परिसर येथील अतिक्रमणे काढून रस्ते भाविकांसाठी मोकळे ठेवले जातात. यात्रा कालावधीत नदीपात्रात दगडी पुलाच्या पलिकडे, दगडी पुलाच्या अलीकडे, स्विस्ते घाटालगत, नगरपालिकेच्या जुन्या कार्यालयाच्या मागे, उद्धव घाटालगत, माहेश्वरी धर्मशाळेजवळ, कुंभार घाटालगत, महाद्वार घाटालगत, कपोळ धर्मशाळेमागे, चंद्रभागा घाट इत्यादी ठिकाणी तात्पुरते संडास उभे केले जातात. तसेच उर्दु

शाळेलगत, नगरवान मंदिरालगत, हिंदू स्मशानभूमी लगत इत्यादी ठिकाणी मिळून एकूण १००० सीट्सचे सार्वजनिक तात्पुरते संडास उभी केली जातात.

पंढरपूर शहराकडे येणारे सर्व रस्ते, गांवातील रस्ते यावर खडी व डांबर टाकून दुरूस्ती केली जाते. शहरातील सर्व सार्वजनिक मुताऱ्यांना चुना सफेदी केली जाते. शहरातील विविध ठिकाणी ३० फॅब्रिकेशनच्या व फायबरच्या मुताऱ्या स्त्रियांसाठी ठेवण्यात येतात.[३३] यात्रेपूर्वी सावरकर पुतळा ते शिवाजी चौक या मुख्य रस्त्यास मिळणारे आडवे रस्ते लोखंडी बॅरेकेटिंग करून बंद केले जातात. तसेच दत्त घाट व नगरपालिका कार्यालया जवळचा घाट बंद करण्यात येतो. शहरातील रस्त्यालगतच्या इमारतींचे सर्वेक्षण करून धोकादायक असलेल्या इमारतींच्या मालकास नोटीस देण्यात येते. तसेच अत्यंत धोकादायक भाग असल्यास नगरपालिकेमार्फत उतरून घेतला जातो.

**३) दवाखाना :**

पंढरपूर नगरपालिकेचे संसर्ग रूग्णालयाकडून भाविकांना २४ तास सेवा पुरविली जाते. यात्राकाळात जिल्हा परिषदेकडून २५ वैद्यकीय अधिकारी व २५ परिचारिका मागविण्यात येतात. पंढरपूर नगरपालिकेच्या दोन रूग्णवाहिका २४ तास आरोग्य सेवा पुरवितात. नगरपालिकेच्या मंजूर पुरवठादार व शासनमान्य कंपनी यांच्याकडून औषधाची मागणी करून पुरेसा औषधसाठा ठेवला जातो.

**४) रोड लाईट :**

रोड लाईट विभागामार्फत शहर व वाळवंट इत्यादी ठिकाणी लाईटची व्यवस्था केली जाते. चंद्रभागा वाळवंट येथे ४० वॅट ट्यूब सेंटचे १० नग, १००० वॅट हॅलोजन सेट १५ नग, ४०० वॅट मेटल हायलाईट सेट २१ नग इत्यादी बसवून लाईटची व्यवस्था केली जाते. सर्व घाट परिसरावर १५० वॅट सोडियम सेट, नदी पात्रातील तात्पुरते शौचालय येथे २०० वॅट बल्ब नग ३० तसेच २० मी. हायमास्ट ३.६ कि.वॅट. लॅम्प २ सेट बसविले जातात.[३४]

**५) पाणीपुरवठा :**

पंढरपूर नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत शहर व वाळवंटात पाणीपुरवठा केला जातो. मंदिर परिसरात दिवसातून २ वेळा पिण्याच्या पाण्याची सोय केली जाते. तसेच ३० शासकीय टँकरद्वारे यात्रेकरूंना पाणीपुरवठा केला जातो. यात्रेकरूंना वाळवंटात पिण्याचे पाणी मिळावे या हेतूने अनिलनगर येथील पाण्याच्या टाकीमधून स्वतंत्र पाईप लाईनद्वारे वाळवंटामध्ये १४ स्टँड पोस्टद्वारे ५६ नळामधून २४ तास पाणीपुरवठा केला जातो. पंढरपूर शहरातील उपनगरी भागात तसेच चढावर हातपंप व विद्युत पंप उपलब्ध असून याद्वारे यात्रेकरूंना व नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येते. वाखरी येथे रिंगण सोहळा होत असल्यामुळे दोन दिवसांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते. तात्पुरत्या शौचालयासाठी पाण्याची सोय केली जाते. वाळवंटात अग्निशमन वाहन उभे करून त्यावर होमगार्डची नियुक्ती केली जाते. वाळवंटात ७.५ एच.पी. इंजिनद्वारे २ स्टँड पोस्ट उभी केली जातात. पिण्याच्या पाण्याच्या टाक्या स्वच्छ केल्या जातात. तसेच शहरातील सर्व पाईपलाईनवरील गळत्याची दुरूस्ती केली जाते. पंढरपूर नगरपालिकेचे ११० हातपंप व ७४ विद्युतपंपाची दुरूस्ती केली जाते.[३५]

**६) यांत्रिकी अभियंता :**

पंढरपूर नगरपालिकेच्या यांत्रिकी अभियंत्यामार्फत पंपिंग मशिनरीची दुरूस्ती व देखभाल केली जाते. या विभागामार्फत तात्पुरत्या शौचालयाचा मैला नदीपात्रामध्ये टँकरवर पंपिंग मशिनरी बसवून उपसा करून भुयारी गटारामध्ये सोडला जातो. विष्णूपद पंपिंग स्टेशन येथील सर्व पंपिंग मशिनरीची देखभाल, दुरूस्तीची कामे करून पंपिंग मशिनरी कार्यक्षम ठेवली जातात. गोपाळपूर येथे प्रक्रिया सयंत्र मशिनरीची देखभाल व दुरूस्तीची कामे करून पंपिंग मशिनरी कार्यक्षम ठेवली जातात.[३६]

अशा प्रकारे पंढरपूर नगरपालिकेने विविध सोयी-सुविधा यात्रेकरूंना व नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

## संदर्भग्रंथ


१) जोशी व. श.; जोशी प. व.; कायमखाने लीला कृ. - 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' न्यायदिप प्रकाशन, १९९१, पृष्ठ क्र. १२१.

२) पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, १९१२-१९१३, पृष्ठ क्र. ५.

३) पंढरपूर नगरपालिका रेकॉर्ड.

४) उपरोक्त

५) www.pandharpurmuncouncil.org

६) www.pandharpurmuncouncil.org

७) दैनिक संचार, २२ सप्टेंबर २००६, पृष्ठ क्र.

८) पंढरपूर नगरपालिका वार्षिक तपासणी अहवाल.

९) पंढरपूर नगरपालिका रेकॉर्ड.

१०) पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, १९६९-१९७०, पृष्ठ क्र. १४.

११) पंढरपूर नगरपालिका रेकॉर्ड.

१२) उपरोक्त

१३) www.pandharpurmuncouncil.org

१४) पंढरपूर नगरपालिका रेकॉर्ड.

१५) उपरोक्त

१६) उपरोक्त

१७) उपरोक्त

१८) www.pandharpurmuncouncil.org

१९) गोखले रामचंद्र महादेव - 'पाश्चिमात्य राजकीय विचारवंत', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७८, पृष्ठ क्र. ६.

२०) पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, १९१२-१९१३, पृष्ठ क्र. ९.

२१) पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, १९२५-१९२६, पृष्ठ क्र. १४.

२२) दैनिक पुढारी, ८ सप्टेंबर २००६, पृष्ठ क्र. ३.

२३) पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, १९६८-१९६९, पृष्ठ क्र. ३८.

२४) उपरोक्त.

२५) लोकमान्य विद्यालय, पंढरपूर, शताब्दी महोत्सव स्मृतीग्रंथ, १९८७, पृष्ठ क्र. १.

२६) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची माहिती पुस्तिका, पृष्ठ क्र. १.

२७) उपरोक्त - पृष्ठ क्र. १२.

२८) उपरोक्त - पृष्ठ क्र. ७.

२९) पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, २००२-२००७.

३०) पंढरपूर नगरपालिका रेकॉर्ड.

३१) उपरोक्त.

३२) उपरोक्त.

३३) उपरोक्त.

३४) www.pandharpurmuncouncil.org

३५) उपरोक्त.

३६) उपरोक्त.